# मराठी ई साहित्य

मराठी तरूण वाचत नाहीत वाचत नाहीत अशी बोंब एकीकडे चालत असताना मराठीत एक साहित्य शाखा फ़ार जोमाने वाढते आहे. ते आहे ई साहित्य. ई साहित्य म्हणजे इंटरनेट किंवा मोबाईल वरून वाचलं जाणारं साहित्य. ज्याला कागदाची गरज नाही. ना छपाई. ना दुकान. ना बाइंडिंग. ना ट्रान्स्पोर्ट. सकाळी लिहीलं. दुपारी पुस्तक बनलं. संध्याकाळी पोस्ट केलं की सेकंदांत जगभरातल्या मराठी लोकांपर्यंत पोहोचणारं साहित्य. ना खर्च. ना वेळ. ना मिडलमन. ना विक्रेते. ई मेल, वेबसाईट, फ़ेसबुक, अशा असंख्य मार्गांनी हे साहित्य लेखकांकडून वाचकांपर्यंत झटक्यात पोचतं. टिव्ही वरच्या बातम्यांसारखं.

ई साहित्य हा साहित्याचा प्रकार नाही. हे साहित्याचं माध्यम आहे. एखादं गाणं घरातल्या घरात म्हणणं, हॉलच्या स्टेजवर म्हणणं, सिडी मध्ये रेकॉर्ड करणं आणि टिव्हीवर प्रसारित होणं यात ते गाणं तेच रहातं. पण माध्यम बदलल्यामुळे त्याचं वजन बदलतं. त्याची परिणामकारकता बदलते. त्याचे श्रोते बदलतात. आणि त्यामुळे त्याची क्वालिटीही बदलते. ऐकणारे जितके जास्त तितकं माणूस काळजीपूर्वक गातो, तयारीने गातो. म्हणजे माध्यम बदललं की साहित्याची क्वालिटी बदलते. पण हे ई साहित्य म्हणजे काय ?

गोष्टी सांगणं(आणि ऐकणं), माहिती देणं (आणि घेणं) या माणसाच्या आदिम गरजा आहेत. त्यातूनच भाषांचा जन्म झाला. त्या वाढल्या. परिपक्व झाल्या. त्या लिखित स्वरूपात आल्या. भिंतीवर, गुहांत, दगडांवर शब्द आले. मग भुर्जपत्रांवर आले. नंतर कागद आला. आणि दोन शतकांपूर्वी छापखाना आला. छपाई तंत्र आलं. आणि इतकी वर्षं जपून ठेवलेलं साहित्य जगभरात पसरलं. अरेबियन नाईट्स भारतात आल्या. महाभारत युरोपात गेलं. ज्ञानप्रसाराचा वेग प्रचंड वाढला. एके काळी जगात एक टक्का लोकांनाही लिहिता वाचता येत नसे. आता जगात स-अक्षरता प्रचंड वाढली. आणि ज्ञानाचा स्फ़ोटच झाला असं म्हणता येईल. विसाव्या शतकाच्या अंतापर्यंत ६०-७० टक्के लोक साक्षर झाले. १९०० साली जगात दहा लाख लोकांनासुद्धा लिहितावाचता येत असेल नसेल. एका गांवात एक शिकलेला माणूस असे किंवा नसे. आता सुमारे ४०० कोटी लोक लिहू वाचू शकतात. हा एक चमत्कारच झाला. हा चमत्कार छपाईच्यामुळे, शिक्षण सार्वत्रिक झाल्यामुळे झाला.

पण इंटरनेट आलं आणि हा स्फ़ोट हा लवंगी फ़टाक्याचा आवाज वाटावा अशी महाप्रचंड क्रांती ज्ञानाच्या जगात झाली. आजवरच्या साहित्याची संकल्पनाच इंटरनेटने बदलून टाकली. म्हणजे कविता किंवा

कथा त्याच राहिल्या. पण त्यांचा वेग बदलला. वाचक बदलले. आवाका बदलला. मूळात लेखकही बदलले. इंटरनेटवर कोणीही लिहू शकतो. स्वतःचा ब्लॉग बनवू शकतो. स्वतःचं पुस्तक प्रकाशित करू शकतो. त्याचा खर्च अगदीच नगण्य असतो. किंमत कमी असल्यामुळे त्याची व्याप्ती खूप जास्त असते. प्रसाराचा वेग खुपच जास्त असतो. पुस्तक लिहिणं, छापणं, पाठवणं, विकणं या सर्व प्रक्रियेत वर्ष वर्ष लागायचं. पण ई साहित्य आता बनतं आणि लगेच प्रसारित होतं. हा परिणाम एकूण निर्मितीच्या क्वांटिटीला पोषक आहे. त्यामुळे स्पर्धा वाढणं आलं. आणि त्यातून क्वालिटीला पोषक वातावरण तयार होईल याची खात्री आपण बाळगू शकतो.

ई साहित्य वाचण्यासाठी कॉम्प्युटर लागतो. पणाता ई साहित्य मोबाईलवरही वाचता येतं. आणि मोबाईलचा प्रसार तर गांवोगांवी झाला आहे. त्यामुळे ई पुस्तकांचा प्रसारही भन्नाट वेगाने होतो आहे. नवीन तरूण हातात कागदी पुस्तकं जरी बाळगत नसले तरी कॉम्प्युटर आणि मोबाईलच्या माध्यमातून चांगल्या साहित्याशी कनेक्टेड असतात. त्यांचं वाचन अनेक अर्थांनी समृद्ध आहे. आणि त्यांना या प्रकारच्या वेगवान वाचनाची आता सवय होत आहे.

ई साहित्य हे खालील पाच गुणांनी वेगळं असतं

१) निर्मिती आणि प्रसाराचा वेग जास्त

२) निर्मिती आणि वितरणाचा खर्च कमी

३) वाचकांच्या प्रतिक्रियांचा वेग आणि ओघ जास्त

४) निर्मितीला चित्र वा ध्वनीच्या आधाराने अधिक सजवणं शक्य

५) टिकाऊपण : एकदा ई साहित्य बनलं की ते नष्ट होण्याची शक्यता नाही. आज लिहीलेलं आणि पोस्ट केलेलं ब्लॉगवरचं साहित्य पाचशे हजार वर्षं तसंच राहण्याची शक्यता आहे.

ई साहित्यासाठी काम करणाऱ्या असंख्य संस्था मराठीत आहेत. प्रस्तुत लेखक ई साहित्य प्रतिष्ठान या संस्थेसाठी काम करतो. ही संस्था नवीन लेखकांची पुस्तकं प्रकाशित करते. गेल्या तीन वर्षांत ई साहित्य प्रतिष्ठानने अडिचशेहून अधिक पुस्तकं प्रकाशित केली आहेत. आणि यातील प्रत्येक पुस्तक चाळीस देशांतल्या सुमारे दिड लाख सभासद वाचकांपर्यंत पोहोचवण्याचं काम केलं आहे. ही पुस्तकं मिळवण्यासाठी esahity@gmail.com या पत्त्यावर एक मेल पाठवली की सभासदत्व मिळतं. तेही विनामूल्य. नंतर दर आठवड्याला विनामूल्य पुस्तकांचा ओघ सुरू होतो. याशिवाय www.esahity.com या वेबसाईटवरही विनामूल्य पुस्तकं वाचायला मिळतील.

ई साहित्य प्रतिष्ठानसारख्या अनेक संस्था आहेत. हजारो व्यक्ती यांत काम करत आहेत. काही व्यवसाय म्हणून. तर काही भाषेची सेवा म्हणून. अशा प्रकारे मराठी साहित्यात एक नवीनच दालन उघडलेले आहे. आणि मराठी साहित्याच्या भविष्याचा एक नवीन अध्याय सुरू झाला आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.